0 7 MAR 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू जयंतीदिनी लोकजीवन संग्रहालयाचा प्रारंभ करणार

## कुलगुरू डी. टी. शिर्के यांची माहिती : 'लोकमत'च्या बातमीचा परिणाम

समीर देशपांडे
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : येत्या २६ जून रोजी राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीदिनी शाहूकालीन लोकजीवन संग्रहालयाचा प्रारंभ करण्यात येणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. ३४ वर्षापासून हे संग्रहालय रखडल्याची दोन भागांची मालिका 'लोकमत'ने प्रकाशित केली होती. याची दखल घेत शिर्के यांनी विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयाची माहिती शनिवारी दिली.

कोल्हापूरमध्ये न्यू पॅलेस येथे शाहू महाराजांविषयी माहिती देणारे संग्रहालय आहे. मात्र, शाहूकालीन लोकजीवन कळावे, यासाठी असे संग्रहालय उभारण्याची मूळ कल्पना पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी मांडली होती. यानंतर शाहू संशोधन केंद्राकडून याबाबतची कार्यवाही सुरू झाली.

त्यावेळी प्रा. टी. एस. पाटील यांची अभिरक्षक म्हणून नेमणूकही करण्यात आली. मात्र, शासनाकडून पदांना मान्यता न मिळाल्याने पाटील यांनी ही नोकरी सोडली. दरम्यानच्या काळात त्यांनी समाजातील सर्व थरांतील नागरिक, व्यावसायिक, संस्था यांच्या सहकार्याने २५० हून अधिक वस्तूंचे संकलन केले. परंतु, त्यानंतर याबाबत फारशा हालचाली झाल्या नाहीत.

ही वस्तुस्थिति 'लोकमत'ने दोन भागांच्या मालिकेद्वारे मांडली. याची दखल घेत कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यवस्थापन समितीच्या सदस्य प्रा. भारती पाटील आणि संग्रहालय विषयातील तज्ज्ञ निलांबरी जगताप यांच्याशी चर्चा केली. सध्या संग्रहालयासाठी विद्यापीठ समोरील पोस्ट ऑफिस शेजारी इमारत उभी आहे.

यामध्ये येणाऱ्या शाहू जयंती दिनी हे संग्रहालय सुरू होईल असा मी शब्द देतो, असे डॉ. शिर्के यांनी 'लोकमत'शी बोलताना सांगितले.

यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिल्या आहेत. त्यामध्ये कोणतीही अडचण येऊ दिली जाणार नाही. शाहूकालीन लोकजीवन कसे होते, याचे प्रत्यंतर शिवाजी विद्यापीठाच्या या नव्या संग्रहालयाच्या माध्यमातून जनतेला कळेल. तसेच नव्या पिढीसाठी हे संग्रहालय सतत प्रेरणा देण्याचे काम करेल, असा विश्वासही कुलगुरू शिर्के यांनी यावेळी व्यक्त केला.

### 'जागर'मुळे फुटली कोंडी




'लोकमत'चे संपादक वसंत भोसले यांनी पंधरवड्यापूर्वी त्यांच्या 'जागर' या सदरामध्ये कोल्हापूरच्या पर्यटनाबाबत आपण कशामुळे पिछाडीवर आहोत, याची मांडणी केली होती. यावर अनेक प्रतिक्रिया आल्या. यातूनच अशा प्रकारचे संग्रहालय ३४ वर्षे कागदावरच असल्याची माहिती मिळाली. यानंतर प्रा. टी. एस. पाटील आणि डॉ. जयसिंगराव पवार यांच्याशी चर्चा करून 'लोकमत'ने दोन भागांच्या मालिकेत वस्तुस्थिती मांडली आणि आता कुलगुरूंनीच शाहू जयंतीदिनी हे संग्रहालय सुरू करणार असल्याचे स्पष्ट केले.

> अशा पद्धतीचा प्रकल्प शिवाजी विद्यापीठाने हाती घेतला होता, याचीच आमच्या पिढीला माहिती नव्हती. मात्र, 'लोकमत'मुळे या प्रकल्पाची माहिती मिळाली. कोल्हापूरचे शाहूकालीन लोकजीवन समजण्यासाठी हे संग्रहालय अत्यावश्यक आहे. - यशोधन जोशी, अभियंता, मूळ कोल्हापूर, सध्या पुणे.



> शिवाजी विद्यापीठामध्ये शाहूकालीन लोकजीवनाचे संग्रहालय उभारण्याची कल्पना कशी रखडली, याची माहिती 'लोकमत'ने दिली. संकलित वस्तू नेमकेपणाने मांडण्यासाठी विद्यापीठासारख्या संस्थेकडून काही ना काही कारणाने विलंब झाल्याचे यातून समजले. हा प्रकल्प मार्गी लागण्याची गरज आहे.
> -निवास माने, उद्योजक, कोल्हापूर

0 7 MAR 2021 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहू महाराज कालातीत महापुरुष

## डॉ. लक्ष्मीकांत देशमुख : डॉ. जयसिंगराव पवार संपादित पुस्तकांचे प्रकाशन

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्राला पुरोगामित्वाची दिशा देणारे राजर्षी शाहू महाराज हे कालातीत महापुरुष आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्रातर्फे ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'राजर्षी शाहू छत्रपती आणि कोल्हापूर' तसेच 'शाहू छत्रपती : राजा आणि क्रांतीकारक' या दोन पुस्तकांचे प्रकाशन झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. जयसिंगराव पवार संपादित पुस्तकांचे प्रकाशन करताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. लक्ष्मीकांत देशमुख. शेजारी चंद्रकांत गायकवाड, प्रा. दिलीप पंगू, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पवार, डॉ. व्ही. एन. शिंदे. (छाया : पप्पू अत्तार)

डॉ. देशमुख म्हणाले, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी वि. रा. शिंदे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांनी देशाला पुरोगामित्वाची दिशा दाखविली. वंचित, शोषितांची चळवळ सुरू आहे तिथे महापुरुषांचे अस्तित्व आहे आणि ते असले पाहिजे. शाहू महाराज यांनी संविधानातील मूलभूत अधिकार, निर्देशित तत्त्वांची अंमलबजावणी करण्याच्या दिशेने कृतिशील पावले उचलली. शाहू महाराज म्हणजे महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांना जोडणारा दुवा ठरले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती शाहू महाराज यांच्या चरित्रांचा आजच्या तरुणांनी अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. त्यांनी स्त्रियांसाठी केलेल्या कार्याविषयी केंद्रामार्फत लवकरच प्रकल्प हाती घेण्यात येईल. डॉ. जयसिंगराव पवार यांनी प्रास्ताविकात दोन्ही ग्रंथांचे औचित्य तपशीलवार समजावून दिले. अनुवादक प्रा. दिलीप पंगू, चंद्रकांत गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. देविकाराणी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सचिन घोरपडे यांनी संयोजन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

# शाहूंनी संविधानिक मूल्ये रुजवली

## लक्ष्मीकांत देशमुख : डॉ. जयसिंगराव पवार संपादित पुस्तकांचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राजर्षी शाहू महाराज यांनी संविधान अस्तित्वात येण्यापूर्वीच संविधानाच्या प्रास्ताविकेमधील स्वातंत्र्य, समता, बंधुता, सहिष्णुता, धर्मनिरपेक्षता या मूल्यांची कसोशीने अंमलबजावणी केली. शिक्षणाचा हक्क, आंतरजातीय विवाह, सक्तीचे मोफत शिक्षण, वेदोक्त प्रकरणानंतरची पुरोगामी चळवळ, त्यादृष्टीने संस्थानात लागू केलेले कायदे यातून संविधानिक मूल्ये रुजवली व त्या दिशेने कृतिशील पावले उचलली. संविधानाची संस्थानात रुजवात करणारे ते एकमेव पूर्वसुरी होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्रातर्फे ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'राजर्षी शाहू छत्रपती आणि कोल्हापूर (खंड-१२)' आणि 'शाहू छत्रपती : राजा आणि क्रांतिकारक (खंड-१३)' या दोन पुस्तकांचे प्रकाशन त्यांच्याहस्ते झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत मद्रास विद्यापीठाचे डॉ. चंद्रा मुदलियार आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जी. एन. वैद्य यांनी दिलेल्या व्याख्यानांचा प्रा. दिलीप पंगू आणि चंद्रकांत गायकवाड यांनी अनुवाद केला.

डॉ. देशमुख म्हणाले, न्या. वैद्यांनी शाहू महाराजांचे चरित्र रंजकपणे मात्र अत्यंत नेमकेपणाने व नेटकेपणाने सांगितले आहे. चंद्रा मुदलियार यांनी कोल्हापुरातील ब्राम्हणेतर चळवळीचा साधंत वेध घेतला आहे. चिकित्सक मांडणीतून त्यांनी इतिहास संशोधनाचा वस्तुनिष्ठ नमुना सादर केला आहे.

डॉ. जयसिंगराव पवार प्रास्ताविकात म्हणाले, शाहू महाराजांनी शैक्षणिक व सामाजिक सुधारणांची चळवळ सुरू केली, तेव्हा ब्राम्हणांना आपल्या प्रतिष्ठेला बाधा आल्यासारखे वाटले. वेदोक्त प्रकरणामुळे या भावनेला टोकाचे स्वरूप येऊन ब्राम्हणेतर चळवळ अधिक गतिमान झाली. अशा अनेक घटना आहेत, की त्यांचे खूप संशोधन होऊ शकते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शाहूंचे चरित्र प्रकाशात आणण्यासाठी केंद्रातर्फे प्रयत्न केले जातील. त्यांनी स्त्रियांसाठी केलेल्या कार्याविषयी केंद्रामार्फत लवकरच प्रकल्प हाती घेण्यात येईल. डॉ. देविकाराणी पाटील यांनी सूत्रसंचालन केले, सचिन घोरपडे यांनी संयोजन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात शनिवारी ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार संपादित दोन पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांच्याहस्ते झाले. यावेळी प्रा. चंद्रकांत गायकवाड, दिलीप पंगू, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पवार, डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. (छाया : आदित्य वेल्हाळ)

### शाहूंचे विविध पैलू प्रकाशात यावेत..

यावेळी मान्यवरांनी, शाहू महाराजांनी वेगवेगळ्या घटकांसाठी केलेले कार्य प्रकाशात येण्याची गरज आहे. महाराजांचे स्त्री-पुरुष समानतेचे काम, त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनी दिलेली साथ, सर फ्रेझर व महाराज यांचे संबंध, राधानगरी धरण बांधतानाची त्यांची तळमळ, राजकीय चळवळीसाठी महाराजांचे कार्य... अशा विविध पैलूंवर शाहू संशोधन केंद्राचे काम करावे, असे आवाहन केले. यावर कुलगुरु डॉ. शिर्के यांनी, या विषयावर संशोधन करून ते पुस्तकरूपाने प्रकाशात आणले जाईल, अशी ग्वाही दिली.

सकाळ
07 MAR 2021

# शाहू महाराज कालातीत महापुरुष

## डॉ. देशमुख : डॉ. जयसिंगराव पवार संपादित दोन पुस्तकांचे प्रकाशन



शिवाजी विद्यापीठ : ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार संपादित पुस्तकांचे प्रकाशन करताना डॉ. लक्ष्मीकांत देशमुख.

कोल्हापूर, ता. ६ : महाराष्ट्राला पुरोगामित्वाची दिशा देणारे राजर्षी शाहू महाराज कालातीत महापुरुष आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्रातर्फे ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'राजर्षी शाहू छत्रपती आणि कोल्हापूर (खंड-१२)' व 'शाहू छत्रपती: राजा आणि क्रांतिकारक (खंड-१३)' पुस्तकांच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत आले. विद्यापीठाच्या छत्रपती शाहू स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत अनुक्रमे मद्रास विद्यापीठाचे डॉ. चंद्रा मुदलियार आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जी. एन. वैद्य यांनी दिलेल्या व्याख्यानांचा प्रा. दिलीप पंगू आणि चंद्रकांत गायकवाड यांनी अनुवाद केला. त्या पुस्तकांचे आज प्रकाशन झाले. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यक्रम झाला.

डॉ. पवार म्हणाले, 'शाहू महाराजांनी सुरवातीला शैक्षणिक व सामाजिक सुधारणांची चळवळ सुरू केली.'

प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये अधीक्षक म्हणून काहीही मानधन न देता काम पाहणारे चंद्रकांत गायकवाड आणि प्रा. दिलीप पंगू यांच्या घराण्यात त्यांच्या वकील आजोबांपासून असणारी शाहूनिष्ठा या धाग्यांमुळे पुस्तकाच्या अनुवादाला त्या शाहूनिष्ठेची किनार लाभल्याचे त्यांनी सांगितले.

अनुवादक प्रा. दिलीप पंगू आणि चंद्रकांत गायकवाड यांचा शाल, पुष्प व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या साहित्यकृतीला राज्य शासनाचा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार केला. डॉ. देविकाराणी पाटील यांनी सूत्रसंचालन केले, सचिन घोरपडे यांनी संयोजन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 MAR 2021
तरूण भारत

# राजर्षींनी समाजात संविधानिक मूल्ये रुजवली

## अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

संविधान अस्तित्वात येण्यापूर्वी संवैधानिक मूल्यांबरोबरच मूलभूत अधिकार व निर्देशित तत्वे करवीर संस्थानात रुजवात करणारे राजर्षी शाहू महाराज हे एकमेव पूर्वसुरी होते. संविधानाच्या प्रास्ताविकामधील स्वातंत्र्य, समता, बंधुता, सहिष्णुता आणि धर्मनिरपेक्षता या मूल्यांची अंमलबजावणी करण्यासही राजर्षी शाहूंनीच प्रोत्साहन दिले. त्यामुळे देशात स्वातंत्र्य, समता, बंधुता नांदत आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.



कोल्हापूर : डॉ. जयसिंगराव पवार यांनी संपादित केलेल्या पुस्तकांचे प्रकाशन करताना साहित्यिक डॉ. लक्ष्मीकांत देशमुख. शेजारी चंद्रकांत गायकवाड, प्रा. दिलीप पंगू, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जयसिंगराव पवार व डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार यांनी संपादित केलेल्या 'राजर्षी शाहू छत्रपती आणि कोल्हापूर (खंड-१२)' व 'शाहू छत्रपती : राजा आणि क्रांतीकारक (खंड-१३)' या दोन पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्राने प्रकाशन सोहळ्याचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. राजर्षी शाहू हे महात्मा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कृतीला जोडणारे महत्वाचे दुवा ठरले असल्याचे सांगून डॉ. देशमुख म्हणाले, सध्या महापुरूषांचे विभूतीकरण व दैवतीकरण सुरू आहे. समाजात वैचारिक प्रतिरोध आवश्यक असला तरी टोकाच्या गोष्टी सामाजिक सलोख्यासाठी धोकादायक ठरत असतात. न्यायमूर्ती वैद्य यांनी मात्र राजर्षी शाहू महाराजांचे चरित्र व सामाजिक सलोखा राखण्यासाठी राजर्षींनी केलेले कार्य नेमकेपणाने सांगून त्याला वेगळी उंची मिळवून दिली आहे. चंद्रा मुदलियार यांनी कोल्हापुरातील ब्राह्मणेतर चळवळीचा वेध घेताना तिला 'कोल्हापूर चळवळ' असे संबोधणे हेच मुळी चळवळीचे वेगळेपण सिद्ध करणारे असल्याचे डॉ. देशमुख यांनी यावेळी सांगितले.

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, राजर्षी शाहूंनी शैक्षणिक, सामाजिक सुधारणांची चळवळ आरंभली. त्यावेळी काही घटकांमध्ये आपल्या प्रतिष्ठेला बाधा पोहोचल्याची भावना निर्माण झाली. वेदोक्त प्रकरणामुळे या भावनेला टोकाचे स्वरुप आले, त्यामुळेच ब्राह्मणेतर चळवळी गतिमान झाल्या. पुढे चळवळींना अखिल वंचितांच्या चळवळीचे स्वरुप आले. अनुवादक प्रा. दिलीप पंगू आणि चंद्रकांत गायकवाड यांचा त्यांच्या साहित्यकृतीला राज्य शासनाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार केला. प्रा. पंगू यांचे भाषण झाले. डॉ. देविकाराणी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले.

0 7 MAR 2021
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी शाहू महाराज कालातीत महापुरुष

## डॉ. लक्ष्मीकांत देशमुख : जयसिंगराव पवार यांच्या दोन पुस्तकांचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्राला पुरोगामित्वाची दिशा देणारे राजर्षी शाहू महाराज हे कालातीत महापुरुष आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू संशोधन केंद्रातर्फे ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार संपादित 'राजर्षी शाहू छत्रपती आणि कोल्हापूर (खंड-१२)' आणि 'शाहू छत्रपती : राजा आणि क्रांतिकारक (खंड-१३)' या दोन पुस्तकांचे प्रकाशन शनिवारी करण्यात आले.

छत्रपती शाहू स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत मद्रास विद्यापीठाचे डॉ. चंद्रा मुदलियार, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जी. एन. वैद्य यांच्या व्याख्यानांचा प्रा. दिलीप पंगू आणि चंद्रकांत गायकवाड यांनी अनुवाद केला. या पुस्तकांच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते.



**कोल्हापूर : डॉ. जयसिंगराव पवार संपादित पुस्तकांचे प्रकाशन करताना डॉ. लक्ष्मीकांत देशमुख. सोबत चंद्रकांत गायकवाड, प्रा. दिलीप पंगू, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी.**

डॉ. देशमुख म्हणाले, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी वि. रा. शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांनी देशाला पुरोगामित्वाची दिशा दाखवली. त्यांना केवळ राज्यापुरते संकुचित करून चालणार नाही. जिथे जिथे वंचित, शोषितांची चळवळ सुरू आहे, तिथे तिथे या महापुरुषांचे अस्तित्व असते, ते असले पाहिजे. वर्तमानात महापुरुषांच्या संदर्भाने दोन बाबी प्रकर्षाने घटताना दिसताहेत. एक तर त्यांचे मोठ्या प्रमाणात विभूतीकरण वा दैवतीकरण सुरू आहे आणि दुसऱ्या बाजूला अतिरेकी विकृतीकरण सुरू आहे. दोन्ही बाबी प्रत्येकजण आपापल्या कृती कार्यक्रमानुसार करत आहेत, हे गैरच आहे.

डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांनी सुरुवातीला शैक्षणिक व सामाजिक सुधारणांची चळवळ आरंभली. त्यावेळी ब्राह्मणांना आपल्या प्रतिष्ठेला बाधा आल्यासारखे वाटले. वेदोक्त प्रकरणामुळे या भावनेला टोकाचे स्वरूप येऊन ब्राह्मणेतर चळवळ अधिक गतिमान झाली. तिचे स्वरूप पुढे अधिक व्यापक बनले आणि तिने सामाजिक, राजकीय सुधारणांसाठी आग्रह धरला.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या चरित्रांचा आजच्या तरुणांनी अभ्यास करण्याची नितांत आवश्यकता आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. पंगू, गायकवाड, डॉ. शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. देविकाराणी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सचिन घोरपडे यांनी संयोजन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

पुण्यनगरी
0 7 MAR 2021

# शिवाजी विद्यापीठाचा ६ एप्रिलला दीक्षांत समारंभ

**कोल्हापूर :** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठाचा ५७ वा दीक्षांत समारंभ मंगळवार, दि. ६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. कोरोनाच्या साथीमुळे यावेळचा दीक्षांत समारंभ ऑनलाईन आयोजित केला आहे. दीक्षांत समारंभासाठी कुलपती व राज्याचे राज्यपाल भगतसिंह



कोश्यारी हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे उपस्थित राहणार आहेत. दीक्षांत समारंभाची तयारी प्रशासनाकडून सुरू असून समारंभाबाबतची अधिक माहिती येत्या काळात देण्यात येणार आहे, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्र. संचालक गजानन पळसे यांनी सांगितले.

0 7 MAR 2021
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या २२ मार्चपासून परीक्षा

## वेळापत्रक जाहीर; १ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२० हिवाळी सत्र परीक्षांना २२ मार्चपासून प्रारंभ होणार आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे १ लाखांहून अधिक विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.


शिवाजी विद्यापीठातून...

विद्यापीठाच्या वतीने पदवी, पदव्युत्तरच्या ३२४ परीक्षा चार सत्रांत घेतल्या जाणार आहेत. परीक्षा विभागातर्फे नियोजन सुरू झाले आहे. पदवी स्तरावरील सत्र २ व ३ आणि पदव्युत्तर २, ३ व ४ सत्र परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. २२ मार्चपासून बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी., बीबीए, बीसीए, बीसीएस अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू होतील. अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार एक तास कालावधीची, ५० गुणांची, बहुपर्यायी प्रश्नावली पद्धतीने ऑनलाईन, ऑफलाईन स्वरूपात घेण्यात येणार आहेत. २५ प्रश्नांसाठी प्रत्येकी दोन गुण असणार आहेत. ऑफलाईन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी परीक्षेकरिता स्वतंत्र उत्तरपत्रिका वापरू नये. परीक्षेकरिता विद्यापीठाकडून 'ओएमआर' शीट पुरविण्यात येणार आहे.

'दूरशिक्षण' पद्धतीने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेसंबंधित अभ्यास केंद्राचे महाविद्यालय येथे होतील. यासाठी सर्व व्यवस्था संबंधित अभ्यास केंद्राच्या महाविद्यालयाने करायची आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर सत्र-२०२० मधील पदवी स्तरावरील प्रथम वर्ष (प्रथम व द्वितीय सत्र) तसेच पदव्युत्तर स्तरावरील प्रथम वर्ष (प्रथम सत्र) परीक्षांचे वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांनी ई-मेल आयडी, मोबाईल अपडेट करावे

ऑनलाईन-ऑफलाईन परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी अपडेट करण्यासाठी विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी तत्काळ मोबाईल क्रमांक, ई-मेल यासह ऑनलाईन-ऑफलाईन पर्याय भरावेत, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

तरुण भारत
07 MAR 2021

# परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ परीक्षा ऑफलाईन आणि ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. २२ मार्चपासून पदवी, १ एप्रिलपासून पदव्युत्तर व विविध कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रमाच्या परीक्षांना प्रारंभ होत आहे. या परीक्षा वस्तुनिष्ठ पध्दतीने तर इंजिनिअरींग, फार्मसी, लॉ, आर्किटेक्चर, एज्युकेशन, मॅनेजमेंट या अभ्यासक्रमांच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने घेण्यास येणार आहेत, अशी माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठातील सर्वच अभ्यासक्रमात २० टक्के कपात करण्यात आली आहे. त्यामुळे ८० टक्के अभ्यासक्रमावरील लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ पध्दतीने असल्याने ५० गुणांसाठी २५ प्रश्न विचारले जाणार आहेत. एका प्रश्नाला २ गुण असून, सर्व प्रश्न सोडवणे बंधनकारक आहे. विद्यापीठ प्रश्नपत्रिका, ओएमआर सीट पुरवणार आहे. पदविका (डिप्लोमा) अभ्यासक्रमाच्या परीक्षा अधिविभाग किंवा महाविद्यालयाने घ्यावयाच्या आहेत. बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी., एम. बी. ए., मास कम्युनिकेशन, जर्नालिझम, बी. होक., बी. एस. डब्ल्यू, यासह अन्य सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत. परीक्षांच्या तारखासंदर्भातील सर्व माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असून, महाविद्यालयांनाही ती कळवण्यात आली आहे.



- पदवी, पदव्युत्तर, कौशल्यावर आधारीत विविध अभ्यासक्रमांचा समावेश
- २२ मार्चपासून परीक्षांना प्रारंभ : परीक्षेसंदर्भात सर्व माहिती संकेतस्थळावर उपलब्ध

सकाळ

07 MAR 2021

# २२ मार्चपासून द्वितीय, तृतीय वर्ष पदवीची परीक्षा

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या पदवी स्तरावरील द्वितीय व् तृतीय वर्षांतील विविध अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्रातील परीक्षांना २२ मार्चपासून सुरुवात होत आहे. बी. ए. भाग दोन- ३१ मार्च, बी. ए. भाग तीन- २३ मार्च,

बी. कॉम. भाग दोन - ५ एप्रिल, बी. कॉम. भाग तीन -२२ मार्च, बी. एस्सी भाग दोन- ३ एप्रिल, बी. एस्सी. भाग तीन -२३ मार्च, बीसीएस ३१ मार्च, बीएस्सी, बीबीए १ एप्रिलपासून सुरू होणार आहे. पदवी व पदव्युत्तर स्तरावरील प्रथम वर्षातील परीक्षा यथावकाश जाहीर करण्यात येणार आहे. परीक्षांसाठी २५ वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा ५० गुणांची प्रश्नपत्रिका असून ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने होणाऱ्या परीक्षेसाठी एक तासाची वेळ असणार आहे. इंजिनिअरिंग, फार्मसी, लॉ, मॅनेजमेंट, शिक्षणशास्त्र, आर्किटेक्चर या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने होतील.

पुण्यनगरी

07 MAR 2021

# विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा २२ मार्चपासून

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा २२ मार्चपासून घेण्यात येणार आहेत. या परीक्षा ऑनलाईन आणि ऑफलाईन या दोन्ही प्रकारात घेण्यात येणार असून, बहुपर्यायी पद्धतीने होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांची हिवाळी परीक्षा २२ मार्चपासून घेण्यात येणार आहे. हिवाळी सत्रामध्ये कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्या शाखेच्या विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ऑक्टोबर सत्रातील एकूण ६२१ परीक्षा होणार आहेत. त्यात प्रथम वर्षाच्या परीक्षाची संख्या १०० आहे. ही परीक्षा एक तासाची असून, ५० गुणांची असणार आहे. प्रत्येक प्रश्नासाठी २ गुण असून, ते बहुपर्यायी असतील. यामध्ये सकाळी १०.३० ते ११.३०, १२.३० ते १.३०, २.३० ते ३.३०, ४.३० ते ५.३० या अशा पद्धतीने या परीक्षा घेण्यात येणार आहे. कोरोनाविषयक शासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करून या परीक्षा घेण्यात येणार आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्र. संचालक गजानन पळसे यांनी दिली.

लोकमत

07 MAR 2021

# ऑनलाईन, ऑफलाईन अर्जासाठी आवाहन

कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर घेण्यात येणाऱ्या परीक्षा या ऑफलाईन की ऑनलाईन द्यायच्या याची माहिती विद्यार्थ्यांकडून भरून घेतली जात आहे. माहिती अद्ययावत करण्यासाठी शुक्रवार (दि. १२)पर्यंतची मुदत देण्यात आल्याचे शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने कळविले आहे. या ऑनलाईन माहिती भरण्याच्या प्रक्रियेतून मात्र एमबीए, इंजिनिअरिंग, फार्मसी, लॉ, अभियांत्रिकी हे व्यावसायिक अभ्यासक्रम मात्र वगळल्याने त्यांनी अर्ज करू नये, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वेबसाईटवर माहिती अद्ययावत करण्याची लिंक देण्यात आली आहे.

0 7 MAR 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परीक्षा ऑफलाईन की ऑनलाईन लिंकवर माहिती भरा : पळसे

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाईन की ऑनलाईन पद्धतीने घ्याव्यात, याची माहिती विद्यार्थ्यांनी उपलब्ध लिंकवर भरावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

पत्रकात म्हटले आहे, परीक्षा ऑनलाईन की ऑफलाईन पद्धतीने घ्यावी, यासाठी ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक, विद्यापीठाचे

**विद्यार्थ्यांना उपलब्ध केलेली लिंक अशी**



Page = online.unishivaji.ac.in
Tab = October २०२० Exam
Link = Upadate Students Mobile No, Mail ID and ONLINE /OFFLINE Exam

अधिविभाग व महाविद्यालय स्तरावर अद्यावत करण्याबाबत कळविले आहे. मात्र, कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, अधिविभाग व महाविद्यालयात जावे लागू नये, यासाठी विद्यार्थ्यांना लिंकचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. ज्या विद्यार्थ्यांनी ४ मार्चपासून माहिती अद्ययावत केली आहे, ते सोडून अन्य विद्यार्थ्यांनी १२ मार्चपर्यंत माहिती भरावी. तसेच एखाद्या विद्यार्थ्याकडून एखाद्या बाबीचा तपशील चुकीचा भरला असेल तर ती सुधारित करण्यासाठी फक्त अधिविभाग व महाविद्यालय स्तरावर दुरूस्ती करण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यासह अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार इंजिनीअरिंग, फार्मसी, आर्किटेक्चर, लॉ, एज्युकेशन व एम.बी.ए. या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने होत असल्याने या वि नोंदी या लिंकमध्ये करण्यात येऊ नयेत, असेही कळविले आहे.

लोकमत
0 7 MAR 2021

# कोल्हापुरात 'यशवंत उत्सव' साजरा होणार

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** नवमहाराष्ट्राचे शिल्पकार, पहिले मुख्यमंत्री आणि देशाचे माजी उपपंतप्रधान स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची येत्या शुक्रवारी (दि.१२) होत असलेली जयंती कोल्हापुरात यशवंत उत्सव म्हणून साजरी होणार आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या पुढाकाराने यशवंतरावांच्या जीवनावर आधारीत वक्तृत्व स्पर्धा, बीज भाषण, बक्षीस वितरण आणि कोल्हापुरातील पहिल्या पुतळ्यावर पुष्पवृष्टी असे भरगच्च उपक्रम ठरवण्यात आले आहेत, अशी माहिती प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष विजयसिंह पाटील यांनी दिली आहे.

गुरुवारी (दि.११) तीन गटांत वक्तृत्व स्पर्धा होणार आहेत. शाहू स्मारक होणाऱ्या स्पर्धेतील तीन गटातून प्रत्येकी ४ असे १२ पुरस्कार विजेते विद्यार्थी निवडले जाणार आहेत. त्यांना संध्याकाळी साडेचार वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शिक्षण उपसंचालक सत्यवान सोनवणे यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस वितरण होणार आहे. ५००१, ३००१, २००१, १००१ रुपये रोख, सन्माचिन्ह, प्रशस्तिपत्र, कृष्णाकाठ हे पुस्तक भेट म्हणून दिले जाणार आहे. शुक्रवारी जयंती दिवशी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेत प्रतिष्ठानने उभारलेल्या यशवंतरावांच्या पुतळ्याला अभिवादन केले जाणार आहे.

पुढारी

07 MAR 2021

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे 'यशवंत उत्सवा'चे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे 'यशवंत उत्सव' साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त वक्तृत्व स्पर्धा, व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष विजयसिंह पाटील, उपाध्यक्ष अशोक पोवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यानिमित्त दि. ११ रोजी शाहू स्मारक भवन येथे तीन गटांतील सुमारे ३८ विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धा होतील. विजेत्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक दिले जाणार आहे. यावेळी पुणे येथील दोन विद्यार्थी यशवंतराव चव्हाण यांच्यावर इंग्रजीत भाषण करणार आहेत. स्पर्धेचे ऑनलाईन थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. सायंकाळी ४.३० वाजता शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य प्रा. मधुकर पाटील यांचे 'यशवंतराव चव्हाण : विचार आणि आजचे दिशाहीन राजकारण' विषयावर व्याख्यान होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, शिक्षण उपसंचालक सत्यवान सोनवणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. दि. १२ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा परिषदेच्या आवारातील यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेला रमेश मोरे, किसन - कल्याणकर, जयकुमार शिंदे आदी उपस्थित होते.